MHGA070015052025

**<u>दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर), अहेरी, जिल्हा- गडचिरोली यांचे न्यायालयात</u>**

<u>(पिठासिन अधिकारी श्री. एस.एम.एच. शाहिद)</u>

**<u>एम.जे.सी. क्रं. १२४/२०२६ (ई-फाईलिंग प्रकरण)</u>**

**<u>अर्जदार</u>** :-

१. श्रीमती यमुनाबाई नानय्या गेडाम,
वय ७२ वर्षे, व्यव. घरकाम,

२. श्री. साई बक्का सिडाम,
वय ६७ वर्षे, व्यव. शेती,

३. श्री. जलाराम बक्का सिडाम,
वय ६५ वर्षे, व्यव. शेती,

४. सौ. अरूणा संतोष कुळमेथे,
वय ४० वर्षे, व्यव. घरकाम,

५. श्री. सतिश रघु सिडाम,
वय ३७ व्यव. शेती,

६. श्री. अविनाश रघु सिडाम,
वय ३५ वर्षे, व्यव. शेती,

७. श्री. विनोद सोमा येरमा,
वय ४७ वर्षे, व्यव. शेती,

८. सौ. शेवंता दौलत सिडाम,
वय ५० वर्षे, व्यव. शेती,

अर्जदार क्रं. १, २, ४, ५, ६, ८ रा. व्येंकटरावपेठा,
ता. अहेरी, जि. गडचिरोली,
अर्जदार क्रं. ३ रा. किष्टापुर, ता. अहेरी, जि. गडचिरोली,
अर्जदार क्रं. ७ रा. संड्रा, ता. अहेरी, जि. गडचिरोली.

**<u>विरूध्द</u>**

**<u>गैरअर्जदार</u>** :- निरंक

**उपस्थीती** :-

..............................................................................................

अर्जदारां तर्फे विद्वान अधिवक्ता - श्री. यु. एस. गलबले,
गैरअर्जदार निरंक

..............................................................................................

## <u>निशाणी क्रमांक ०१ खालील आदेश</u>
## <u>(दिनांक ०९ एप्रिल २०२६ रोजी पारीत)</u>

अर्जदारांनी मुंबई अधिनियम-VIII, १८२७, अन्वये उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. <u>मय्यत बक्का विस्तारी सिडाम, यांचे दिनांक २६/०२/२०१२ रोजी निधन झाले. मय्यत बक्का विस्तारी सिडाम, यांची मुलगी मय्यत पैकुबाई सोमा येरमा, यांचे दिनांक २०/०१/२०१६ रोजी निधन झाले. मय्यत बक्का विस्तारी सिडाम, यांचा मुलगा मय्यत रघु बक्का सिडाम, यांचे दिनांक ०३/०७/१९९६ रोजी निधन झाले. मय्यत बक्का विस्तारी सिडाम, यांची पत्नी मय्यत अमक्का बक्का सिडाम, यांचे दिनांक ०२/०८/२०१३ रोजी निधन झाले.</u> अर्जदार क्रं. १ ते ३ हे मय्यत बक्का विस्तारी सिडाम, व मय्यत अमक्का बक्का सिडाम यांचे मुले आहेत. अर्जदार क्रं. ४ ते ६ हे मय्यत बक्का विस्तारी सिडाम, व मय्यत अमक्का बक्का सिडाम यांचे नातवंड असुन मय्यत रघु बक्का सिडाम, यांचे मुले आहेत. अर्जदार क्रं. ७ व ८ हे मय्यत बक्का विस्तारी सिडाम, व मय्यत अमक्का बक्का सिडाम यांचे नातवंड असुन मय्यत पैकुबाई सोमा येरमा, यांचे मुले आहेत. अर्जदार हे मय्यत बक्का विस्तारी सिडाम, यांचे वारस असल्याबाबत उत्तराधिकारी प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदारांनी सदर अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे अर्जावर जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला तसेच दैनिक "नवराष्ट्र" वृत्तपत्रामधून निशाणी क्रमांक १६ प्रमाणे दि. २३/०१/२०२६ रोजी दैनिक नवराष्ट्र वृत्तपत्रात जाहीर नोटीस देण्यात आली. अर्जदाराने आपल्या कथनाच्या समर्थनार्थ निशाणी क्र. ०९ प्रमाणे अर्जदार क्रं १ चे प्रतिज्ञापत्र दाखल केले. तसेच ग्रामपंचायत, व्यंकटरावपेठा यांनी निर्गमित केलेले मय्यत बक्का विस्तारी सिडाम, यांचे मृत्युप्रमाणपत्र **निशाणी क्रं. १०**. ग्रामपंचायत, नागेपल्ली यांनी निर्गमित केलेले मय्यत पैकुबाई सोमा येरमा, यांचे मृत्युप्रमाणपत्र **निशाणी क्रं. ११**. ग्रामपंचायत, व्यंकटरावपेठा यांनी निर्गमित केलेले मय्यत अमक्का बक्का सिडाम, यांचे मृत्युप्रमाणपत्र **निशाणी क्रं. १२**. ग्रामपंचायत, व्यंकटरावपेठा यांनी निर्गमित केलेले वारसाण दाखला **निशाणी क्रं. १३**. पोलीस पाटील, संन्ड्रा यांनी निर्गमित केलेले वारसाण **निशाणी क्रं. १४**. ग्रामपंचायत व्यंकटरावपेठा यांनी निर्गमित केलेले वारसाण **निशाणी क्रं. १५**. ग्रामपंचायत व्यंकटरावपेठा यांनी निर्गमित केलेले मय्यत रघु बक्का सिडाम, यांचे मृत्युप्रमाणपत्र **निशाणी क्रं. १७** वर आहेत.

३. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मय्यत बक्का विस्तारी सिडाम, व मय्यत अमक्का बक्का सिडाम यांचे मुले आहेत. अर्जदार क्रं. ४ ते ६ हे मय्यत बक्का विस्तारी सिडाम, व मय्यत अमक्का बक्का सिडाम यांचे नातवंड असुन मय्यत रघु बक्का सिडाम, यांचे मुले आहेत. अर्जदार क्रं. ७ व ८ हे मय्यत बक्का विस्तारी सिडाम, व मय्यत अमक्का बक्का सिडाम यांचे नातवंड असुन मय्यत पैकुबाई सोमा येरमा, यांचे मुले आहेत. पुढे असे की, अर्जदारांचे शिवाय मय्यत बक्का विस्तारी

सिडाम, यांना इतर कोणीही वर्ग-१ चे वारस नसल्याचे प्रथमदर्शनी पुराव्यावरुन दिसुन येते. उत्तराधिकारी प्रमाणपत्र देण्याबाबत ईतर कोणीही हरकत न घेतल्यामुळे **अर्जदार हेच मय्यत बक्का विस्तारी सिडाम, यांचे वर्ग-१ चे वारस आहे अशी मान्यता देण्यात यावी असे या न्यायालयाचे मत आहे.** सदर प्रकरण हे ई-फाईलिंग प्रणाली व्दारे दाखल करण्यात आले असुन प्रकरणाचे कोणतेही कागदपत्रे ( मुळ किंवा सत्यप्रति ) न्यायालयात उपलब्ध्द नाहीत. म्हणुण *" माननिय मुंबई उच्च न्यायालय यांचे ई-फाईलिंग नियम २०२२ " च्या नियम १०(३) मधील निर्देशानुसार संबंधित वकिलांनी प्रकरणाचे मूळ दस्त व कागदपत्रे त्यांचे कडे जतन करुण ठेवण्याचे निर्देश देण्यात येते.* प्रकरणाच्या निकाला करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर.

२. अर्जदार क्रं १. श्रीमती यमुनाबाई नानय्या गेडाम, अर्जदार क्रं. २. श्री. साई बक्का सिडाम, अर्जदार क्रं. ३. श्री. जलाराम बक्का सिडाम, अर्जदार क्रं. ४. सौ. अरूणा संतोष कुळमेथे, अर्जदार क्रं. ५. श्री. सतिश रघु सिडाम, अर्जदार क्रं. ६. श्री. अविनाश रघु सिडाम, अर्जदार क्रं. ७. श्री. विनोद सोमा येरमा, व अर्जदार क्रं. ८. सौ. शेवंता दौलत सिडाम, हे मय्यत बक्का विस्तारी सिडाम, यांचे वर्ग-१ चे एकमेव वारस आहे अशी मान्यता देण्यात येत आहे.

३. अर्जदाराचे नावे नियमाप्रमाणे आवश्यक ती स्टॅम्प डयुटी घेवुन उत्तराधिकारी प्रमाणपत्र जारी करण्यात यावे.

४. उत्तराधिकारी प्रमाणपत्रात दिवाणी प्रक्रिया संहिता मधिल परिच्छेद क्र. ३१२ चा उलेख करण्यात यावा.

५. प्रकरणातील संबंधीत वकिल व पक्षाकारांना निर्देशित करण्यात येते की, " माननिय मुंबई उच्च न्यायालय यांचे ई-फाईलिंग नियम २०२२ " च्या नियम १०(३) मधील निर्देशाची पुर्तता करावी.

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.04.09 15:43:19 +0530

अहेरी
दि. ०९/०४/२०२६

(एस.एम.एच. शाहीद)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अहेरी.